दैनिक
# विश्वजगत

RNI No:- MAHMAR/2023/86213
https://epaper.dainikvishwajagat.in

मुख्य संपादक गजानन काटे : 9096873185
E-mail : dainikvishvjagato101@gmail.com

■ बुलडाणा ■ वाशिम ■ अकोला ■ अमरावती ■ यवतमाळ ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ परभणी ■ जालना ■ नाशिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ जळगाव खान्देश ■ धुळे ■ रायगड ■ ठाणे ■ पुणे ■ सातारा ■ नांदेड

बुधवार दिनांक 15 एप्रिल 2026 | वर्ष : 4 थे | अंक : 315 वा | पाने : 4 | किंमत : 5 रुपये



# अमेरिकेने म्हटले- होर्मुझच्या नाकेबंदीसाठी 10,000 सैनिक तैनात

## 24 तासांत कोणतेही जहाज इथून गेले नाही; इस्रायल-लेबनॉनमध्ये युद्धबंदी चर्चा झाली

**प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत**

अमेरिकन सैन्य दलाने मंगळवारी दावा केला की, होर्मुज सामुद्रधुनीच्या नाकेबंदीसाठी त्यांनी 10,000 हून अधिक सैनिक आणि सुमारे 12 नौदल जहाजे तैनात केली आहेत.

अमेरिकन सेंट्रल कमांडनुसार, नाकेबंदीच्या पहिल्या 24 तासांत कोणतेही जहाज हा मार्ग पार करू शकले नाही. 6 व्यापारी जहाजे पुढे जात होती, ती अमेरिकन सैन्याच्या आदेशावरून परत फिरली.ही कारवाई त्या सर्व जहाजांना लागू आहे जी इराणच्या बंदरांमध्ये जात आहेत किंवा तिथून निघत आहेत, ती कोणत्याही देशाची असोत. तथापि, काही मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात आला होता की, मंगळवारी इराणशी संबंधित 4 जहाजे या मार्गातून जाण्यात यशस्वी झाली.दरम्यान, दुसरीकडे अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनमध्ये लेबनॉन आणि इस्त्रायल यांच्यात युद्धविरामावर पहिल्या फेरीची चर्चा झाली. ही सकारात्मक असल्याचे सांगितले गेले आणि दोन्ही पुढील फेरीच्या चर्चेसाठी सहमत झाले. तथापि, दुसऱ्या फेरीच्या चर्चेचा दिवस किंवा वेळ अद्याप निश्चित नाही.

अमेरिकेतील इस्त्रायलचे राजदूत येचिएल लीटर यांनी सांगितले की, अमेरिकेतील भेटीदरम्यान झालेल्या चर्चेत लेबनॉन सरकारने स्पष्ट केले की, त्यांना आता हिजबुल्लाहच्या ताब्यात राहायचे नाही.

गेल्या 24 तासांतील 5 मोठे अपडेट्स

1. अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने सांगितले आहे की, इराणी तेलाच्या विक्रीसाठी दिलेली तात्पुरती सूट आता काही दिवसांत संपेल आणि ती पुढे वाढवली जाणार नाही.

2. युरोपीय देश युद्धांनंतर होर्मुज सामुद्रधुनीमध्ये जहाजांची वाहतूक पुन्हा सामान्य करण्यासाठी एका मोठ्या आंतरराष्ट्रीय आघाडीची योजना आखत आहेत. विशेष म्हणजे, या प्रस्तावित मोहिमेत अमेरिकेला समाविष्ट केलेले नाही.

3. कॅनडाने लेबनॉनसाठी 40 दशलक्ष डॉलर (सुमारे 330 कोटी रुपये) मदतीची घोषणा केली आहे. ही मदत आंतरराष्ट्रीय संघटनांद्वारे पोहोचवली जाईल.

4. हिजबुल्लाहने दावा केला आहे की, त्यांच्या सैनिकांनी गेल्या 24 तासांत 34 लष्करी हल्ले केले आहेत. संघटनेनुसार, या हल्ल्यांमध्ये इस्त्रायलच्या वस्त्या, सैनिक जमावडे आणि लष्करी वाहनांना लक्ष्य करण्यात आले.

5. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की, इराणसोबतची चर्चा पुढील 2 दिवसांत पुन्हा सुरू होऊ शकते.




## अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाडवर खंडणी प्रकरणात गुन्हा

**प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत**

अकोला - अकोल्याचे अपर जिल्हाधिकारी प्रमोद राहुल गायकवाड यांच्यावर खंडणी आणि लाच मागितल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अकोला जिल्हा खाण व क्रशर उद्योजक संघाचे कार्याध्यक्ष विवेक प्रभाकर बिजवे यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. त्यांनी दिलेल्या रिपोर्टनुसार, अपर जिल्हाधिकारी गायकवाड यांनी त्यांना फोन करून ते संघटनेचे कार्याध्यक्ष असल्यामुळे त्यांच्याकडून १५ हजार रुपये आणि संघटनेच्या इतर प्रत्येक सदस्याकडून प्रतिमहिना ५ हजार रुपये देण्याची मागणी केली.

## भोंदू खरातच्या मालमत्तांची 2 गोण्या कागदपत्रे जप्त:ईडीचा फास, अधिकाऱ्यांना नोटिसा, स्वतंत्र चौकशीही

**प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत**

नाशिक -भोंदूबाबा अशोक खरात याच्याविरोधात गुन्ह्यांची मालिका सुरूच असून मंगळवारी त्याच्या पोलिस कोठडीत चौथ्यांदा वाढ झालेली असतानाच आता या बहुचर्चित प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाची (ईडी) एन्ट्री झाली आहे. 'ईडी' च्या विशेष १३ सदस्यीय पथकाने खरातचे नाशिकमधील निवासस्थान, सिन्नर (मिरगाव) येथील कार्यालये आणि पुण्यातील त्याच्या सीएच्या (सनदी लेखापाल) ठिकाणांवर सोमवार व मंगळवार असे दोन दिवस छापे टाकले आहेत. या कारवाईत दोन गोण्या भरून महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली असून यात अनेक बड्या सरकारी अधिकाऱ्यांचे 'कनेक्शन' उघडकीस आले आहे. या अधिकाऱ्यांची ईडी स्वतंत्र चौकशी करणार असून त्यांना नोटिसा बजावण्यात येणार आहेत.

खरातच्या नाशकातील कर्मयोगीनगरमधील 'तृप्तबाला' या बंगल्यात तब्बल १५ तासांच्या झडतीत जप्त केलेल्या दोन गोण्या कागदपत्रांची सध्या पथकाकडून कसून तपासणी सुरू आहे. प्राथमिक माहितीतून या कागदपत्रांमध्ये नाशिकसह पाथर्डी आणि गौळाणे शिवार परिसरातील



मोक्याच्या भूखंडांच्या खरेदी-विक्रीचे आणि मालकीचे दस्तऐवज सापडले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे खरातशी संबंधित अनेक मालमत्ता आणि भूखंड हे काही बड्या शासकीय अधिकाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावे असल्याचे समोर आले आहे.



**ठाणे : दिव्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त सार्वजनिक जयंती उत्सव उत्सव मंडळ दिवा शहर आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने भव्य रॅली काढण्यात आली. प्रसंगी दिवा शहरातील सर्व राजकीय पक्ष्यांनी सदर रॅलीत सहभागी झाले होते. प्रसंगी मा. आमदार सुभाष भोईर, नगरसेवक दीपक जाधव, दीपाली भगत, आदेश भगत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )**

# राज्यावर उष्णतेच्या लाटेचे संकट:उष्णता कृती आराखडा लागू, तापमानापासून संरक्षणासाठी 3 विशेष SOPs जारी; 15 जिल्ह्यांवर विशेष लक्ष

राज्यात वाढत्या तापमानाचा पारा ४७ ते ५० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत असताना, नागरिकांच्या आणि विशेषतः ऊन-वारा अंगावर सोसणाऱ्या घटकांच्या संरक्षणासाठी राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. राज्य उष्णता कृती आराखडा आणि भारतीय हवामान विभागाच्या (IMD) सतर्कतेनुसार, सरकारने तीन व्यापक मानक कार्यपद्धती (SOPs) जारी केल्या आहेत. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी या निर्णयाची घोषणा करत १५ उच्च-जोखीम असलेल्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित केल्याचे सांगितले.आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी या एसओपींची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. राज्यातील १५ जिल्ह्यांमध्ये उष्णतेची तीव्रता सर्वाधिक असते. यामध्ये लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड या जिल्ह्यांचा समावेश आहे.

**प्रभावी अंमलबजावणीचे महाजन यांचे आदेश**

आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. "वातावरणातील बदलामुळे तापमान ४९ अंशांपर्यंत जात आहे. त्यामुळे केवळ नियम करून चालणार नाही, तर जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबवली जाईल," असे महाजन यांनी स्पष्ट केले.

**५० अंशांचा अभ्यास करून एसओपी तयार - विनिता सिंगल**

मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल यांनी सांगितले की, मागील सहा



महिन्यांपासून या एसओपींवर सखोल अभ्यास सुरू होता. जळगावमध्ये तापमान ५० अंशांपर्यंत पोहोचण्याच्या परिस्थितीचाही यात विचार करण्यात आला आहे. सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत नागरिकांनी घराबाहेर पडताना काय काळजी घ्यावी, याचे सविस्तर मार्गदर्शन यात दिले आहे.

महत्त्वाचे हेल्पलाईन क्रमांक :जिल्हा नियंत्रण कक्ष: १०७७
रुग्णवाहिका: १०८
पोलीस हेल्पलाईन: ११२ / १०० या मोहिमेत महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, म्हाडा, सिडको आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा सक्रिय सहभाग असणार आहे. दरवर्षी या एसओपींचा आढावा घेऊन त्यात आवश्यक सुधारणाही केल्या जाणार आहेत.

### काय आहेत या तीन विशेष SOPs?

**१. रस्त्यावरील कष्टकऱ्यांसाठी सुरक्षा (SOP-1): रस्त्यावरील विक्रेते, बांधकाम मजूर, वाहतूक पोलीस, स्वच्छता कर्मचारी आणि डिलिव्हरी कामगारांसाठी ही नियमावली आहे.**

**वेळापत्रकात बदल: पिवळ्या, केशरी आणि लाल सतर्कतेनुसार कामाच्या वेळेत बदल करणे.**

**सुविधा: ठिकठिकाणी पाणी बूथ, ओआरएस (ORS) वाटप, सावलीची व्यवस्था आणि आरोग्य सुविधांवर भर.**

**२. खाण कामगारांसाठी विशेष तरतूद (SOP-2):**

**ही एसओपी प्रामुख्याने चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणींसाठी आहे.**

**विश्रांती केंद्रे: कामाच्या ठिकाणी 'थंड विश्रांती केंद्रे' (Cooling Centers) उभारणे.**

**जॉब रोटेशन: कामगारांना सतत उन्हात न ठेवता कामाची अदलाबदल करणे आणि महिला कामगारांसाठी विशेष सोयी पुरवणे.**

**३. उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माण (SOP-3):**

**गरीब व वसाहतींमधील घरांचे तापमान कमी करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांवर भर.**

**कूल रूफ: घरांच्या छतावर रिफ्लेक्टिव्ह पेंट किंवा सावलीची व्यवस्था करणे.**


**नगररचना: मास्टर प्लॅन आणि गृहनिर्माण योजनांमध्ये 'ग्रीन स्पेस' आणि हवामान-संवेदनशील डिझाइनचा समावेश करणे.**



## डॉ बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता !

विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३५ वी जयंती. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ बाबासाहेब आंबेडकर व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे. डॉ बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. 'मूकनायक' पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले. इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी "आम्ही शासनकर्ती जमात बनणार" या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, "या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते."पत्रकार महामानव डॉ बाबसाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!!

**श्याम ठाणेदार**,दौंड जिल्हा पुणे




# डॉ. बाबासाहेबांना डोक्यात घ्यायचे कि डोक्यावर हे ठरवा

विश्व रत्न , भारत रत्न , भारत भाग्य विधाता , भारतीय संविधानाचे शिल्पकार आदरणीय , सन्माननीय , माननीय डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांची जयंती आपण मोठ्या थाटामारत, उत्साहात , आनंदात दरवर्षी साजरी करीत असतो. केलीही पाहिजे ते प्रत्येक भारतीयांचे कर्तव्यच आहे. मात्र आपण त्यांचा आदर्श घेतो का त्यांना अपेक्षित असे वागतो का हे प्रश्न आपल्या मनाला विचारणे अत्यंत महत्वाचे वाटत आहे. जे सुशिक्षित आहे तेही डॉ. बाबासाहेबाच्या जयंतीला दारू पिऊन नाचतो , अंधश्रद्धा पाळतो हे अपेक्षित आहे का आज हा लेख लिहिताना एक गोष्ट मनाला खूप लागते आपण जयंती मोठी करतोय, पण समाज मोठा करत नाही.आपण डिजे मोठा लावतोय, पण विद्यार्थ्यांची स्वप्ने मोठी करत नाही. आपण बॅनर मोठे लावतोय, पण विचार मोठे करत नाही. आणि हे वास्तव आहे, खूप कडू आहे, पण हेच सत्य आहे.ज्या माणसाने आयुष्यभर भूक, अपमान, अन्याय,भेदभाव सहन करून फक्त एकच गोष्ट सांगितली शिका, या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीला आज आपण काय करतो?लाखो रुपये जमा करतो, डिजे लावतो, मिरवणूक काढतो, नाचतो, व्हिडिओ काढतो, स्टेटस ठेवतो... आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा आपलं आयुष्य तिथेच सुरू होतं ना शिक्षण वाढतं, ना नोकऱ्या वाढतात, ना वाचन वाढतं, ना समाज बदलतो.मग स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा आपण बाबासाहेबांना अभिवादन करतोय की फक्त कार्यक्रम करतोय? खरं सांगायचं तर आज अनेक गावात भिमजयंतीसाठी 2 लाख, 3 लाख, 5 लाख रुपये सहज जमा होतात. पण त्याच गावात एक चांगलं वाचनालय नसतं. मुलांना अभ्यास करायला जागा नसते. स्पर्धा परीक्षेची पुस्तकं नसतात. एखाद्या गरीब मुलाला कॉलेजची फी भरायला पैसे नसतात. एखादा हुशार मुलगा फक्त पैशाअभावी शिक्षण सोडतो. एखादी मुलगी फी नसल्यामुळे पुढे शिकत नाही. पण त्याच गावात डिजे मात्र 50 हजाराचा असतो. लाईट 30 हजाराची असते. बॅनर 20 हजाराचे असतात. हे वास्तव आहे, आणि हे वास्तव मनाला टोचलं पाहिजे.कारण एक गोष्ट लक्षात ठेवा डिजे वर नाचणारा समाज कधीच इतिहास घडवत नाही पुस्तकावर झुकणारा समाज इतिहास घडवतो.आपण एक दिवस 10 हजार लोकांची मिरवणूक काढतो, पण त्या 10 हजार लोकांमध्ये 100 अधिकारी तयार होत नाहीत. आपण 50 बॅनर लावतो, पण 50 विद्यार्थी स्पर्धा परीक्षा पास होत नाहीत. आपण स्टेज लावतो, पण अभ्यासिका लावत नाही. आपण नेत्यांना बोलावतो, पण शिक्षकांना बोलावत नाही. आपण गाणे लावतो, पण व्याख्यान ठेवत नाही. हीच खरी शोकांतिका आहे.काही लोकांना हे बोललेलं आवडणार नाही, पण सत्य नेहमी गोड नसतं. सत्य नेहमी अस्वस्थ करतं. आणि समाज बदलायचा असेल तर आधी समाजाला अस्वस्थ व्हावं लागतं.जरा विचार करा जर एका गावाने ठरवलं की यावर्षी डिजे नाही लावायचा, त्याऐवजी त्या पैशातून वाचनालय सुरू करायचं.दरवर्षी 10 गरीब विद्यार्थ्यांची फी भरायची.स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सुरू करायचं. अभ्यासिका सुरू करायची. तर 10 वर्षांनी त्या गावातून अधिकारी, शिक्षक, वकील, प्राध्यापक, लेखक, पोलीस, सैनिक तयार होतील की नाही? नक्की होतील.मग खरी जयंती कोणती डिजे वाजवायचा ची की वाचनालयाची ची?आपण एक गोष्ट विसरत आहोत जयंतीचा उद्देश बाबासाहेबांचा फोटो लावणे नाही, तर बाबासाहेबांसारखा माणूस तयार करणे आहे. समाजाला डिजे ची गरज नाही, समाजाला मदतीची , सहकार्यांची ची गरज आहे. समाजाला मिरवणुकीची गरज नाही, समाजाला खऱ्या मार्गदर्शनाची ची गरज आहे. समाजाला बॅनरची गरज नाही, समाजाला करियर ची गरज आहे. समाजाला आवाजाची गरज नाही, समाजाला अभ्यासाची गरज आहे. काळजाला लागणारी एक गोष्ट सांगतो आपण जयंतीसाठी वर्गणी मागायला प्रत्येक घरात जातो,पण त्या घरातलं मूल शाळेत जातं का, कॉलेजला जातं का, फी भरली का, पुस्तकं आहेत का हे विचारायला जात नाही.हीच आपली सर्वात मोठी चूक आहे. लक्षात ठेवा,जयंती मोठी करून समाजमोठा होत नाही समाज मोठा केला तर जयंती आपोआप मोठी होईल असे मला वाटते. जय भिम , जय संविधान



**राजेश दौलतराव दामधर**
मु.पो. भारज बु
ता. जाफ्राबाद जि. जालना
मो. 97 30 45 79 40

# अवैध वीज वापर अखेर कधी थांबणार ?

**संतोष पडवळः दै.विश्वजगत**

ठाणे : दिवा-शिळ–मुंब्रा–कळवा परिसरातील अवैध वीज जोडण्या कायद्याचे उल्लंघनच नव्हे तर जनजीवनासाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे. मार्च 2020 मध्ये महावितरणचे फ्रँचायझी म्हणून टोरेंट पॉवरने दिवा -शिळ –मुंब्रा–कलवा परिसरातील वीज वितरणाची जबाबदारी स्वीकारली. या भागातील वाढते तांत्रिक व वाणिज्यिक नुकसान कमी करणे तसेच नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध करून देणे हा या नियोजनामागील मुख्य उद्देश आहे.




गेल्या सहा वर्षांत टोरेंट पॉवरने वीज वितरण जाळ्याचे सुदृढीकरण, पायाभूत सुविधा सुधारणा, मीटरयुक्त व कायदेशीर वीज जोडण्या देणे तसेच वीज चोरी रोखण्यासाठी सातत्याने विविध मोहिमा राबवल्या आहेत. तरीही अत्यंत खेदजनक बाब म्हणजे काही परिसर व गृहनिर्माण संकुलांमध्ये आजही अवैध वीज वापर व नेटवर्कशी छेडछाड सुरूच आहे. देवरीपाडा, राशिद कंपाऊंड, जीवन बाग, अमृत नगर, अमीनाबाद आदी भागांमध्ये अवैध हुकिंग व नेटवर्क टॅम्परिंगमुळे वीज वाहिन्या कमकुवत होत आहेत. परिणामी वारंवार वीजपुरवठा खंडित होतोच, शिवाय शॉर्ट सर्किट, आग लागणे व अन्य विद्युत अपघातांचा गंभीर धोका निर्माण होतो. अशा दुर्घटनांमध्ये जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महत्त्वाचे म्हणजे, अवैध वीज वापरणाऱ्यांचा फटका नियमितपणे बिल भरून कायदेशीर वीज वापरणाऱ्या प्रामाणिक ग्राहकांनाही बसतो.

नेटवर्क देखभालीसाठी नागरिकांचे सहकार्य अत्यावश्यक वीजपुरवठा सुरक्षित व स्थिर राखण्यासाठी टोरेंट पॉवरकडून वेळोवेळी नेटवर्क सफाई, देखभाल व अवैध जोडण्या हटविण्याची कारवाई केली जाते. मात्र काही ठिकाणी या कामांना विरोध केला जातो, त्यामुळे अत्यावश्यक सुधारणा व देखभाल कार्यात अडथळे निर्माण होतात. वेळेत नेटवर्क देखभाल न झाल्यास, येत्या भीषण उन्हाळ्यात दीर्घकाळ व वारंवार वीज खंडित होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्य नागरिक, ज्येष्ठ व्यक्ती व लहान मुलांना प्रचंड त्रास सहन करावा लागू शकतो.

टोरेंट पॉवरचे नागरिकांना आवाहन

अवैध वीज जोडण्या व नेटवर्कशी छेडछाड करणाऱ्यांना कोणतेही पाठबळ देऊ नका. नेटवर्क सफाई व देखभाल कामांमध्ये टोरेंट पॉवरच्या कर्मचाऱ्यांना पूर्ण सहकार्य करा. स्वतःच्या व कुटुंबीयांच्या सुरक्षिततेसाठी केवळ मीटरयुक्त व कायदेशीर वीज जोडणीच वापरण्याचे आवाहन करत आहे.

# 180 तरुणींचे लैंगिक शोषण आणि 350 अश्लील व्हिडिओ व्हायरल

## आरोपी मोहम्मद अयाजला बेड्या

**अजय टप : दै.विश्वजगत**

अमरावती- जिल्ह्यातील परतवाडा येथे अनेक तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून, त्यांचे लैंगिक शोषण केल्याच्या आणि त्यानंतर ब्लॅकमेल करून अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर या संशयित आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.



या प्रकरणात भाजप खासदार अनिल बोंडे यांनी संबंधित आरोपीने तब्बल 180 तरुणींचे शोषण करून त्यांचे 350 व्हिडिओ व्हायरल केल्याचा धक्कादायक आरोप केल्यानंतर पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत ही कारवाई केली असून, या खळबळजनक प्रकरणाचा अधिक तपास सध्या सुरू आहे.

नाशिकच्या भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण ताजे असतानाच, अमरावती जिल्ह्यातही मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर या तरुणाने सुमारे 200 मुलींचे लैंगिक शोषण केल्याच्या खळबळजनक आरोपाने मोठी खळबळ उडाली आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल करून त्याला तातडीने अटक केली असून, न्यायालयात हजर केले असता त्याला 21 एप्रिलपर्यंत सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या धक्कादायक प्रकरणाचा अधिक तपास आता पोलिस यंत्रणेमार्फत केला जात आहे.

हे जाळे खूप मोठे पसरलेले

अनिल बोंडे म्हणाले, या प्रकरणात काही मुस्लिम आणि हिंदू समाजाच्या मुली देखील आहेत. हे जाळे खूप मोठे पसरलेले आहे, आणि विशेष म्हणजे चिखलदरा हॉटेलमधील पोलिसांनी सीसीटीव्ही जप्त करून सहा महिन्यातील फुटेज तपासले तर त्या आधारे रॅकेट उघड होऊ शकतो. पोलिसांनी या प्रकरणाच्या खोलात जायला पाहिजे आणि महिला अधिकाऱ्यांनी आणि सायबर मधील अधिकारी यांची नेमणूक केली पाहिजे, अशी मागणी देखील बोंडे यांनी केली आहे.

### आरोपी एमआयएमचा कार्यकर्ता- अनिल बोंडे


**परतवाडा पोलिसांनी अश्लील व्हिडिओ प्रकरणी ताब्यात घेतलेला युवक एमआयएमचा कार्यकर्ता असल्याचा खळबळजनक आरोप खासदार अनिल बोंडे यांनी केला असून, हे केवळ एका व्यक्तीचे कृत्य नसून यामागे एक मोठी टोळी सक्रिय असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या टोळीने स्नॅपचॅट आणि व्हॉट्सअॅपवर ग्रुप्स तयार करून हे जाळे पसरवले असल्याचे सांगत, पोलिसांनी संबंधित आरोपींचे मोबाईल जप्त करून त्यांच्या कॉल डिटेल्सची आणि संपर्काची सखोल चौकशी करावी.**

# जनतेने सतर्क राहून,वाढत्या उन्हापासून स्वत:चा व कुटूंबाचा बचाव करावा .

## "उन्हाळा 29 एप्रिल ते दहा12 मे काळजी घ्या.आणीबाणीचा इशारा जारी... "

**संजय कडोळे : दै.विश्वजगत**

वाशीम : भारतिय हवामान खात्याच्या अंदाजानुसार येत्या दिनांक २९ एप्रिल २०२६ ते १२ मे २०२६ पर्यंत, सूर्यनारायण अक्षरशः आग ओकण्याची शक्यता असल्यामुळे, वातावरणात अचानक उष्णतेचा पारा वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. त्यातही महत्वाचे विदर्भाचे तापमान प्रचंड वाढण्याची शक्यता असल्यामुळे संबधीत यंत्रणेकडून नागरिकांना सावधगीरीचा इशारा देण्यात आलेला आहे. त्यामुळ नागरीकांनी शक्यतोवर आपली बाहेरची कामे सकाळचे दहा पूर्वी उरकून घ्यावीत. त्यानंतर सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत कोणीही बाहेर (विशेषतः मोकळ्या जागांमध्ये) जाऊ नये. हवामान खात्याने सांगितले आहे की या काळात तापमान ४५°C ते ५५°C पर्यंत वाढू शकते. त्यामुळे आरोग्यावर उष्माघाताचा त्रास होण्याची शक्यता आहे. जर कोणाला श्वास घेण्यास त्रास होत असेल किंवा अचानक अस्वस्थ वाटत असेल,तर तात्काळ आपल्या फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. किंवा जवळच्या प्राथमिक आरोग्य केन्द्र अथवा शासकिय रुग्नालयातील उष्माघाता कक्षाशी संपर्क साधावा.योग्य वायुवीजनासाठी राहत्या घराच्या खोल्यांचे दरवाजे उघडे ठेवा. मोबाईल फोनचा वापर कमीत कमी करा, अति उष्णतेमुळे मोबाईल स्फोट होण्याचा धोका आहे.काळजी घ्या आणि ही माहिती इतरांना कळवा. उष्णतेपासून बचावासाठी, घरातच शिजवलेले हलके व थंड अन्न पदार्थ खावे. घरगुती थंड पेय, मिठ साखर पाणी, खडी साखरेचे पाणी,लिंबू शरबत,दही,ताक, फळाचा ज्युस, आणि विड्याच्या पानांचा रस यांसारखी थंड पेये भरपूर प्यावे. मातीच्या माठातील थंडगार पाणी प्यावे. शासनाच्या नागरी संरक्षण विभागाने जनतेसाठी आणि रहिवाशांसाठी खालील सूचना जारी केल्या आहेत. येत्या काही दिवसांत तापमान ४७°C ते ५५°C पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. काही भागांमध्ये उष्ण वारे वाहण्याची शक्यता आहे, ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. म्हणून, खालील खबरदारीचे पालन करावे: उन्हाळयाच्या दिवसात प्रवासात असतांना गॅसची उपकरणे, कार्बनयुक्त पेये,सुगंध आणि बॅटरी ठेवू नये. गाडीत हवा खेळती राहण्यासाठी गाडीच्या खिडक्या थोड्या उघड्या ठेवा. गाडीची इंधन टाकी ( पेट्रोल किंवा डिझेलने)पूर्णपणे भरू नका. इंधन टाकी संध्याकाळी भरा. गाडीने प्रवास करणे टाळा. प्रवास करताना टायरमध्ये जास्त हवा भरू नका. अंगावर हलके,पातळ,सुती, पांढरे व सैल कपडे घाला. डोळ्याला सन गॉगल्स, डोक्यावर कॅप,टोप किंवा रुमाल बांधा. कानात कापसाचे बोळे ठेवा.रात्रीला झोपण्यापूर्वी थंड पाण्याने अंघोळ करून घ्या. कुलर किंवा एअर कंडिशनर घरामधन किंवा गाडीमधून लगेच उन्हात जाऊ नका. तसेच उन्हामधून आल्यावर लगेच कुलर किंवा एअर कंडिशनर रुममध्ये जाऊ नका.बाहेरून आल्यावर लगेच थंडगार पाणी किंवा थंड पेय पिऊ नका. अधून मधून ग्लुकोजचे पाणी, ओ आर एस चे पाणी, खडी साखरेचे पाणी



प्या.जेवणानंतर लगेच उन्हात जाऊ नका. थंड असणाऱ्या फळाचे ज्युस व फळे खा. विंचू आणि साप थंड ठिकाणी घरात येऊ शकतात, त्यामुळे काळजी घ्या. भरपूर पाणी आणि द्रवपदार्थ प्या. गॅस सिलेंडर उन्हात ठेवू नका.विद्युत मीटरवर जास्त भार टाकू नका.एअर कंडिशनिंगचा वापर फक्त आवश्यक खोल्यांमध्येच करा. विद्युत उपकरण आणि मोबाईल यांना अधून मधून थोडा वेळ बंद ठेवा.दर २-३ तासांनी किमान ३० मिनिटांची शारीरिकदृष्ट्या विश्रांती घ्या.जेव्हा बाहेरील तापमान ४५-४७°C असेल, तेव्हा एसी २४-२५°C वर सेट करा.सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत थेट सूर्यप्रकाश टाळा. उन्हाळ्यात भिमसेनी कापूर व पांढरा कांदा जवळ ठेवून अधून मधून नाकाजवळ घेऊन वास घ्या.भोजनात कांदा सलाद घ्या. उष्माघात झाल्याचे वाटत / असल्यास भिमसेनी कापूर आणि पांढऱ्या कांद्याचे मिश्रण शारिराला लावा. असे आवाहन नागरी संरक्षण विभागाने केले आहे. त्यामुळे आता समाजातील प्रत्येक नागरिकांनी आप आपल्या आरोग्याची आणि जिवीताची काळजी घेण्यासाठी सावधगीरी बाळगावी.विशेषतः शेतकरी, शेतमजूर,ग्रामस्थ,चाकरमाने, बांधकाम मिस्त्री,असंघटीत कामगार,मजूर,फेरीवाले लघुव्यावसायिक,लग्न सोहळ्याचे आयोजक आणि वऱ्हाडी मंडळी (बाराती), प्रवासात असणारे प्रवाशी इत्यादींनी सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत,दुपारच्या रखरखीत उन्हामध्ये बाहेर कामे करणे, प्रवास करणे शक्यतोवर टाळावे. असे आवाहन करण्यात आले असल्याचे महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त समाजसेवक संजय कडोळे यांनी कळवीले आहे.

VISHWA JAGAT -Printed & Published by GAJANAN RAJARAM KATE Printed at GAJANAN Printers : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.)1 and Published at VISHWA JAGAT Office : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.) Editor GAJANAN RAJARAM KATE Mob.No.9096873185 RNI No:- MAHMAR/2023/86213

विश्वजगत हे पत्र मालक, प्रकाशक, गजानन राजाराम काटे यांनी मुद्रक गजानन प्रिंटींग प्रेस, मुद्रण स्थळ FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून मुद्रित करून - कार्यालय : विश्वजगत कार्यालय,FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून प्रकाशित केले. संपादक : गजानन राजाराम काटे मो. 9096873185 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतील. (पी. आर. बी. अॅक्ट नुसार कार्यकारी संपादक जबाबदार राहतील.) सर्व वाद विवाद अकोला न्यायालयांतर्गत राहील.) Email : dainikvishvjagato101@gmail.com RNI No:- MAHMAR/2023/86213

## आयुष्य .......

आयुष्य म्हणजे एखादी
ठरलेली वाट नसते
ती शोधत शोधत
चालायची वाट असते
कधी हसत पुढे जायच
कधी रडत थांबायच
पण त्या वाटेवर माघार
घ्यायची नसते
या वाटेवर लोक येतात
लोक जातात
काही जखमाही देतात
पण शेवट पर्यंत
उभ राहायचे असते
त्या वाटेवरच्या प्रत्येक
वळणावर काटि तरी
शिकायचे असते
हेच आयुष्य आहे मित्रांनो
याला आप आपल्या पद्धतीने
जगायचे असते ..... !

**राजेश दौलतराव दामधर**
मु.पो. भारज बु
ता. जाफ्राबाद जि. जालना
मो. 97 30 45 79 40



# कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर आपघातवार ; दोन आपघातात 13 जणांचा मृत्यू



**संतोष पडवळ : दैनिक विश्वजगत**

ठाणे : कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर काळजाचा थरकाप उडवणारी घटना सोमवारी घडली. एक सिमेंट मिक्सर आणि काळी-पिवळी इको टॅक्सी यांच्यात समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात 11 प्रवाशांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा अपघात इतका भीषण होता की, इको कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून गाडीचा सांगाडा ओळखणेही कठीण झाले आहे. तर पोटगाव येथे दुचाकी आपघातात 2 जणांचा मृत्यू झाला आहे. नेमकं काय घडलं? मिळालेल्या माहितीनुसार, पांजार पुलावर झाला मोठा अपघात झाला. सकाळी ११ वाजून १५ मिनिटांनी घडली घटना घडली. इको गाडीतून मुरबाड मधील काही रहिवाशी कल्याणला जात होते. याच दरम्यान पांजार पुलावर मोठा अपघात झाला. अपघातात एक आज्जी आश्चर्यकारक रित्या बचावली आहे. प्रवाशांनी भरलेली इको कार महामार्गावरून जात असताना समोरून येणाऱ्या सिमेंट मिक्सरने तिला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कारमधील प्रवाशांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. या कारमध्ये एकूण 12 प्रवासी होते, त्यापैकी 11 जणांचा जागीच मृत्यू झाल्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली. एक जण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. स्थानिकांची मदतीसाठी धाव, पोलिसांकडून पंचनामा सुरू अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी घटनास्थळी धाव घेतली. चक्काचूर झालेल्या कारमधून मृतदेह बाहेर काढण्याचे काम स्थानिकांनी अत्यंत जड अंतःकरणाने केले. टिटवाळा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी मृतांचा अधिकृत आकडा अद्याप जाहीर केला नसला तरी, मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. अपघाताचे कारण अद्याप अस्पष्ट हा अपघात नेमका कशामुळे झाला? चालकाचा ताबा सुटला की वेगाचा अतिरेक नडला? हे अद्याप समजू शकलेले नाही. टिटवाळा पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून बाजूला करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या भीषण अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला होता.

## गोजेगाव जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती साजरी

**सुनील गायकवाड : दैनिक विश्वजगत**



मुखेड:तालुक्यातील गोजेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक मळगे सर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्वांनी महामानवाला विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी शाळेतील शिक्षक बाराळे सर, डांगे सर, दायमी सर तसेच सौ. लांडगे मॅडम, मोमीन मॅडम, मुस्तापुरे मॅडम उपस्थित सुधीर चाकुरे .सामाजिक कार्यकर्ते सुनिल गायकवाड.कलाल कलार समाज संघटना तालुका अध्यक्ष. प्रभाकर जेमदडे. यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विचार मांडून आदरांजली वाहिली.

## गोजेगाव येथे नरसिंग महाराज प्राथमिक शाळेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी.

**सनिल गायकवाड: दै.विश्वजगत**



मुखेड- तालुक्यातील गोजेगाव येथे नरसिंग महाराज प्राथमिक शाळेत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठलराव सुर्याजीराव पाटील गोजेगावकर यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महामानवाच्या कार्याचा गौरव केला या अभिवादन कार्यक्रमास शाळेतील शिक्षक दत्तात्रय देशमुख तानाजी भायगावे ज्ञानेश्वर धुमाळे किरण सावंत वसंत वडजे भगवंत वासरे ऋषिकेश सुगावे.देविदास पाटील तसेच शाळेचे सेवक प्रकाश गायकवाड यांच्यासह सामाजिक कार्यकर्ता सुनिल गायकवाड इतर कर्मचारी. विद्यार्थी उपस्थित होते.

## तक्षशिला बहुउद्देशीय संस्था भीम टेकडी उमरखेड येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती 135 वी साजरी करण्यात आली

**अविनाश सोनुले: दैनिक विश्वजगत**





उमरखेड- उमरखेड येथे तक्षशिला बहुउद्देशीय संस्था भीम टेकडी उमरखेड येथे फार मोठ्या प्रमाणात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर 135 वी भीम जयंती साजरी करण्यात आली तक्षशिला बहुउद्देशीय संस्थेचे महासचिव राजेश उर्फ दत्ता यंग खंदारे यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले नियोजन समितीचे उपाध्यक्ष अविनाश भाऊ सोनुले अन्नपूर्णाबाई बनसोडे सहसचिव डॉक्टर गायकवाड ताई भीम टेकडी येथे राहणारे सामाजिक कार्यकर्ते खंदारे भाऊ भारतीय दलित कोब्राचे सामाजिक संघटनेची अनेक कार्यकर्ते उपस्थित होते भीम टेकडी येथे येत्या 20 वर्षापासून तक्षशिला बहुउद्देशीय संस्था च्या वतीने विविध प्रकारचे कार्यक्रम राबविण्यात येत आहे बुद्ध वासी भंते वप्प तक्षशिला बौद्ध संस्थेचे अध्यक्ष होते परंतु सात वर्षाया पूर्वी ते बुद्ध वाशी झाले त्यांचे स्वप्न होते की भीम टेकडी येथे वृद्धाश्रम व अनाथ आश्रम मी सुरू करेल म्हणते व पचे स्वप्न लवकर साजरी करू असे आव्हान राजेश खंदारे यांनी केले आहे तसेच अर्जुन समितीचे उपाध्यक्ष अविनाश भाऊ सोनवणे यांनी सुद्धा म्हटले की या कामांमध्ये माझे पूर्ण सहकार्य राहील संस्थेचे महासचिव यांच्या खांद्याला खांदा लावून मी संघर्ष करेल असे आव्हान सोनुले भाऊ यांनी केले आहे सकाळी साडेआठच्या दरम्यान ध्वजारोहण करून पंचशील झेंड्याजवळ हजारों झाल्यानंतर बौद्ध वंदना घेण्यात आली यावेळी तसेच शीला बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारी राजेश खंदारे अन्नपूर्णाबाई बनसोड अविनाश सोनुले संघर्ष खंदारे येथे राहणारे नरे भाऊ व भारतीय दलित कोब्रा सामाजिक संघटनेचे पदाधिकारी फार मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

## दिव्यातील सोहम बने "भारत उदय श्री तर सुरज खळेची भारत कुमार श्री स्पर्धेत निवड

**संतोष पडवळ: दै.विश्वजगत**



ठाणे : दिवा शहरातील श्रीमंतयोगी जिम्नेशियम मधील सोहम बने यांची भारत उदय श्री स्पर्धेत व सुरज खळे याची भारत कुमर श्री पदी निवड झाल्याने सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. दिवा शहरात राहणारा सोहम बने व सुरज खळै गेली एक वर्षापासून श्रीमंतयोगी जिममध्ये मेहनत घेत असून जिमचे प्रशिक्षक ओमकार सावंत आणि रवी शेजवळ यांचे सुरजला मोठं योगदान मिळाले आहे. मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील मालदोली बांद्रेवाडी हे सुरज शिवराम खळे यांच छोटंस गाव असून आपली मेहनत व जिद्दीच्या बळावर महाराष्ट्र कुमार श्री स्पर्धेत सूरजची निवड झाली आहे. व्यायामाची आवड असलेल्या सुरजला श्रीमंतयोगी जिम्नेशियमचे संचालक राहुल कानसकर व संकेश भावे यांचे देखील वेळोवेळी योगदान मिळाले असल्याचे सुरज खळे यांनी स्पष्ट केले आहे. मागील वर्षीच्या ठाणे जिल्हा ४५ वी अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धेत सूरज यांनी तिसरा क्रमांक पटकावला होता. सुरज खळे यांची महाराष्ट्र कुमार श्री स्पर्धेत निवड झाल्याने दिवा शहरात सर्व स्तरातून अभिनंदन व पुढील वाटचालीस अनेक शुभेच्छा देण्यात येत आहे.

# सारोळा पिर येथे भिमजयंती उत्साहात

## सामाजिक एकात्मतेचे झाले दर्शन

**गोपाल काटे : दै.विश्वजगत**







मोताळा – तालुक्यातील सारोळा पिर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अभूतपूर्व उत्साहात साजरी करण्यात आली. संपूर्ण गाव भीममय झाले होते. विविध धार्मिक व सामाजिक घटक एकत्र येत या उत्सवात सहभागी झाल्याने गावात सामाजिक एकात्मतेचे प्रभावी दर्शन घडले.१४ एप्रिल रोजी सकाळपासूनच कार्यक्रमांना सुरुवात झाली.यावेळी सायंकाळी सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विधिवत पूजन करण्यात आली. त्यानंतर पंचशील व त्रिशरणाचे गायन करण्यात आले. गावातील तरुणांनी व महिला वर्गाने मोठ्या उत्साहात सहभाग घेत कार्यक्रमाला उर्जा दिली. यानंतर गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. डीजेच्या तालावर गावकरी थिरकले व जयभीमच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. मिरवणूक गावातील प्रमुख मार्गांवरून फिरत असताना सर्वत्र स्वागत करण्यात आले. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ पोहोचताच शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. हार अर्पण करून आरती करण्यात आली. “जय भवानी, जय शिवराय” व “जय भीम” अशा घोषणांनी वातावरण भारावून गेले. या उत्सवात विशेष म्हणजे गावातील सर्व समाजातील नागरिक, विविध धर्मांचे प्रतिनिधी, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जात-पात, धर्मभेद विसरून एकत्र येत साजरी करण्यात आलेली ही जयंती खऱ्या अर्थाने सामाजिक एकात्मतेचा आदर्श ठरली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. शांतता, शिस्त व उत्साह यांचा सुंदर संगम या सोहळ्यात पाहायला मिळाला. सारोळा पिर गावाने या निमित्ताने एकतेचा संदेश देत आदर्श निर्माण केला आहे.

## रिसोड तालुका माहेश्वरी संघटनेची कार्यकारिणी बिनविरोध जाहीर; अध्यक्षपदी विनोद लढ्ढा, तर सचिवपदी श्याम पल्लोड यांची निवड




**प्रशांत सरनाईक : दै.विश्वजगत**

*रिसोड : येथील माहेश्वरी भवन येथे रिसोड तहसील माहेश्वरी संघटनेची नूतन कार्यकारिणी निवडण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत उत्साही आणि गरिमामय वातावरणात पार पडलेल्या या सभेत संघटनेची आगामी काळासाठीची कार्यकारिणी बिनविरोध निवडण्यात आली. समाजाची एकजुटता आणि विश्वासाचे दर्शन घडवत पार पडलेली ही निवड प्रक्रिया समाजबांधवांसाठी अभिमानास्पद ठरली आहे. या निवडणूक प्रक्रियेसाठी मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. पवन भंसाली यांनी काम पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन कार्यकारिणीची विधिवत घोषणा करण्यात आली. या प्रसंगी निवडणूक उपअधिकारी कृष्णा पल्लोड सर आणि निवडणूक पर्यवेक्षक तथा जिल्हा उपाध्यक्ष डॉ.राजकुमार मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती. नवनियुक्त पदाधिकारी मध्ये तहसील माहेश्वरी संघटना अध्यक्ष विनोद लढ्ढा तर सचिव श्याम पल्लोड यांची निवड करण्यात आली तर महिला संघटना कार्यकारिणी अध्यक्ष सौ.सुरेखा पुरुषोत्तम तोष्णीवाल यांची तर सचिव पदी सौ. रूपा धूत यांची निवड करण्यात आली. रिसोड तालुक्यातील बहुसंख्य समाजबांधवांच्या उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडली. नवनियुक्त पदाधिकारी आपल्या कार्यकाळात सेवा, सदाचार आणि संघटन ही त्रिसूत्री राबवून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी कटिबद्ध राहतील, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. या निवडीबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून आणि समाजबांधवांकडून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

महत्त्वाचे

## कोल्हापुरात 28 वर्षीय विवाहित तरुणीचा मृत्यू; सोन्याच्या लोभाने बळी?



कोल्हापूर: राधानगरी तालुक्यातील तरसंबळे गावात रविवारी रात्री घडलेल्या विवाहितेच्या संशयास्पद मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विवाहित रूपाली प्रवीण गुरव (वय 28) हिच्या मृत्यूमागे सासरच्या बाजूने केलेला सततचा छळ आणि दहा तोळे सोन्याच्या मागणीमुळे घातपात झाल्याचा गंभीर आरोप तिच्या आई-वडिलांनी केला आहे. या प्रकरणात पती प्रवीण गुरव याला राधानगरी पोलिसांनी ताब्यात घेतले असून, निष्पक्ष तपास आणि न्यायाची मागणी नातेवाईक करत आहेत.

विवाहानंतर सुरू झाला छळाचा त्रास

राधानगरी येथील पांडुरंग गुरव यांची कन्या रूपालीचा विवाह 2018 मध्ये तरसंबळे येथील प्रवीण गुरव यांच्याशी झाला होता. लग्नाच्या काही दिवसांतच सासू-सासऱ्यांसह पतीने दहा तोळे सोन्याची मागणी सुरू केली. याशिवाय माहेरील शेतजमिनीचे हस्तांतरणही करून द्यावे, अशी सक्ती केली जात होती. यामुळे रूपालीला सतत मानसिक आणि शारीरिक छळ सहन करावा लागत होता. तिला दोन लहान मुले असूनही सासरच्या या वागण्यामुळे ती वारंवार माहेरी परत येत होती. नातेवाईकांच्या माहितीनुसार, अनेकदा मध्यस्थीच्या बैठका झाल्या; पण तरीही छळ थांबला नाही. शनिवार रात्री सासरी गेल्यानंतर रविवारी रात्री अचानक रूपालीचा मृत्यू झाला. ही घटना कळताच नातेवाईकांनी ग्रामस्थ आणि पोलिसांच्या मदतीने मृतदेह राधानगरी ग्रामीण रुग्णालयात नेला. प्राथमिक तपासात संशय निर्माण झाल्याने मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात पाठवण्यात आला.

# वर्दडीत भिमजयंतीनिमित्त संविधान पुस्तिका वाटपाचा दिमाखदार सोहळा, आमदार कायंदे यांच्या हस्ते उद्घाटन

**अनिल दराडे : दैनिक विश्वजगत**

सिंदखेडराजा : वर्दडी बु. येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचायत समिती सिंदखेड राजा व ग्रामपंचायत वरदडी च्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला जाणार आहे. यावेळी पंचायत समिती मार्फत ग्रामपंचायत मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने वाचनालय सुरू केले जाणार आहे. गटविकास अधिकारी अजित बांगर यांच्या कल्पनेतून उद्या तालुक्यात अजून एक वाचनालय सुरू होत आहे.तसेच गावकऱ्यांना संविधान पुस्तिकांचे वाटप केले जाणार आहे. याशिवाय यावेळी अनुसूचित जाती महिला बचत गटास कर्ज वाटप सुध्दा केले जाणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. मनोजभाऊ कायंदे यांच्या शुभहस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी मा. संजय खडसे साहेब राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी मा. अजितकुमार बांगर साहेब उपस्थित राहणार आहेत.

आयोजकांची फळी सज्ज

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सरपंच सौ. पुष्पाबाई मधुकर ईनकर, उपसरपंच श्री. मधुकर निवृत्ती ईनकर, ग्रामपंचायत अधिकारी मा. प्रशांत पाटसकर यांच्यासह सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रा.पं. सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय व समस्त गावकरी मंडळी सज्ज झाली आहे

भिमजयंतीच्या या पवित्र दिनी संविधानाच्या मूल्यांचा जागर करण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

स्थळ: ग्रामपंचायत सार्वजनिक वाचनालय, वर्दडी बु. ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा




# एका महिन्यात राहता शहरातील महामार्ग पूर्ण होणार : डॉ. सुजय विखे पाटील

**संजय महाजन : दैनिक विश्वजगत**

राहाता-नगर मनमाड महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून राहता शहरातील रस्त्याचे काम येत्या एका महिन्यात पूर्ण करून पावसाळ्यापूर्वी नागरिकांच्या सेवेसाठी खुले केले जाईल, असा विश्वास भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला. आज सकाळी डॉ. विखे पाटील यांनी राहता शहरातील नगर–मनमाड महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करत कामाचा आढावा घेतला. ठेकेदार व अधिकाऱ्यांसमवेत गटर्स, डिव्हायडर तसेच रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाची सविस्तर पाहणी करण्यात आली. ग्रामीण रुग्णालयापासून शहराच्या हद्दीपर्यंत तसेच साकुरी फाटा ते मार्केट कमिटी परिसरापर्यंतच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर, नगरसेवक, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.महामार्गाच्या कामात व्यापारी वर्गाला कोणताही त्रास होऊ नये, यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राहाता नगरपंचायत हद्दीतील नगर–मनमाड रस्त्याच्या कामाची आज पाहणी करताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी नागरिकांच्या सुविधेला प्राधान्य देत रस्त्याचे नियोजन करण्यात आल्याचे स्पष्ट केले. हा रस्ता सुरक्षित, सुबक आणि आधुनिक करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुधारणा केल्या जात असून, पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याचा मानस आहे. प्रारंभीच्या टप्प्यात रस्त्याच्या साईड लेव्हल्स जास्त उंच ठेवल्यामुळे परिसरातील दुकाने व व्यावसायिकांना अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या माध्यमातून व पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रस्त्याच्या डिझाइनमध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले. आता रस्त्याची उंची नियंत्रित ठेवून कोणत्याही व्यावसायिकाला नुकसान होणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे. बसस्थानक परिसरातील रस्ता नव्या डिझाइननुसार विकसित केला जात असून, अनावश्यक उंची टाळून समतोल पातळी राखली जात आहे. यामुळे वाहतूक सुलभ होण्यासोबतच नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ होणार आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेले जुने डिव्हायडर काढून टाकण्यात येणार असून, त्याऐवजी एकसंध डिव्हायडर उभारला जाणार आहे. सध्या असलेले लाईट पोल व झाडे यांचे योग्य नियोजन करून झाडांचे स्थलांतर केले जाईल. त्यामुळे रस्त्याची रुंदी आणि दृष्यता वाढेल. तसेच, गटर लाईनपासून दोन्ही बाजूंना साधारण दोन मीटर अंतरात फुटपाथ विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या भागात पेव्हिंग ब्लॉक बसवून नागरिकांसाठी सुरक्षित पादचारी मार्ग तयार केला जाणार आहे. यासाठी राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीत येणाऱ्या अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. राहाता शहरातील स्ट्रीट लाईट व्यवस्था इलेक्ट्रिकल पद्धतीने उभारली जाणार असून, शहराबाहेरील हायवे परिसरात सोलर स्ट्रीट लाईट बसवण्यात येणार आहेत. यामुळे वीजबिलाचा प्रश्न सुटून दीर्घकालीन सुविधा उपलब्ध होणार आहे. या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, रात्रीच्या वेळीही सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सोय उपलब्ध होईल. गेल्या काही काळात या रस्त्यावर झालेल्या अपघातांची दखल घेऊन महामार्गाचे काम जलद गतीने सुरू असून कोणीही रस्त्या मध्ये बाधा आणू नये ही विनंती आहे. हा रस्ता नागरिकांच्या भल्यासाठी आहे. अनेक लोकांचे जीव ह्या मधल्या कालावधी मध्ये गेलेले आहेत आणि म्हणून या रस्त्या मध्ये जरी कोणी अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल.कुठल्याही पक्षाचा असो, त्याला माफ केलं जाणार नाही असे ही डॉ. सुजय विखे पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले. पावसाळ्यापूर्वी हा रस्ता पूर्ण करून राहाता शहरातील नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला असून हा नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

# जनगणना टाळणाऱ्यांवर कारवाईचा इशारा; सिंदखेडराजा प्रशासनाचा कडक पवित्रा तहसिलदार अजित दिवटे

**संजय महाजन: दै.विश्वजगत**



सिंदखेडराजा, अनिल दराडे दि. १३ एप्रिल : देशभर २०२७ च्या जनगणना प्रक्रियेला सुरुवात झाली असताना सिंदखेडराजा तालुक्यात मात्र काही कर्मचाऱ्यांकडून काम टाळण्याचे प्रकार समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने कडक भूमिका घेत जनगणना नाकारणाऱ्या किंवा टाळाटाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. तहसिलदार अजित दिवटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, जनगणना हे अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय कर्तव्य असून त्यासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांनी ते प्राधान्याने पार पाडणे आवश्यक आहे. मात्र, काही कर्मचारी खोटी वैद्यकीय प्रमाणपत्रे सादर करणे, आदेश रद्द करून घेणे किंवा इतर व्यक्तींमार्फत अधिकाऱ्यांवर दबाव आणण्याचे प्रकार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. प्रशासनाचा स्पष्ट इशारा अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कायदा काय सांगतो? जनगणना अधिनियम १९४८ अंतर्गत कलम ५ व ११ नुसार, जनगणना कामात अडथळा आणणे किंवा आदेशाचे उल्लंघन करणे हा दंडनीय गुन्हा आहे. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. कोणावर होणार कारवाई? प्रशासनाने खालील प्रकार करणाऱ्यांना विशेष लक्षात घेतले आहे – जनगणना आदेश रद्द करण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर करणारे दबावतंत्राचा वापर करून आदेश रद्द करून घेणारे इतर व्यक्तींमार्फत कार्यालयीन अधिकाऱ्यांवर दबाव आणणारे प्रशासनाच्या या कडक भूमिकेमुळे जनगणना काम टाळणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये आता खळबळ उडाली असून, कामकाज अधिक शिस्तबद्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# "अडथळा आणाल तर 25 वर्षांचे बाड उघडेल!"

## नगराध्यक्ष सौरभ तायडेंचा अजित पवार गटाला इशारा



**अनिल दराडे : दै.विश्वजगत**

सिंदखेडराजा -सिंदखेडराजा, 13 एप्रिल: नगरपालिकेच्या कामात भ्रष्टाचार होत असल्याची तक्रार अजित पवार गटाच्या नगरसेवकांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्यानंतर आज राजकीय वातावरण तापले.

तक्रारीच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष सौरभ तायडे यांनी आज शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेत विरोधकांवर तोफ डागली. "विकास कामाला सहकार्य करा, अडथळा आणू नका. काही चुकीचे काम असेल तर तक्रार नक्की करा. पण विकास कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला तर मी 25 वर्षांचे बाड जनतेसमोर आणेल" असा सणसणीत इशारा तायडेंनी नाव न घेता अजित पवार गटाच्या नगरसेवकांना दिला.

युवा नगराध्यक्ष सौरभ तायडे म्हणाले की, शहराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे. उगाच राजकारण करून कामे अडवू नयेत. चुकीच्या कामांवर आक्षेप घ्या, पण चांगल्या कामात खोडा घालू नका.

नगराध्यक्षांच्या या इशाऱ्यानंतर सिंदखेडराजाच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. 25 वर्षांचे बाड म्हणजे काय? कोणाची पोलखोल होणार? याचीच चर्चा सध्या शहरात रंगली आहे




# शेतकरी बांधवांनी संघटित होऊन शाश्वत शेतीकडे वळावे .... सुप्रसिद्ध सह्याद्री फार्म चे चेअरमन श्री विलास जी शिंदे यांचे आवाहन

**संजय महाजन: दै.विश्वजगत**



सामोडे - क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले जयंतीचे औचित्य साधून नंदुरबार, धुळे व नाशिक जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या महात्मा फुले विकास मंडळ नाशिक यांचेमार्फत दि. 11 एप्रिल 2026 शनिवार रोजी साई कृष्णा रिसॉर्ट, पिंपळनेर येथे कृषी मेळावा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना सह्याद्री फार्मचे चेअरमन व कार्यकारी संचालक श्री विलासजी शिंदे यांनी वरील उद्गार काढले. यापुढे बोलताना श्री विलासजी शिंदे म्हणाले की, शेतकरी बांधवांनी मानसिकता बदलून पारंपारिक शेतीत न अडकता आधुनिक शेतीकडे वळले पाहिजे. शासनावर अवलंबून राहता शेतकऱ्यांनी संघटित होऊन स्वतःच मार्ग शोधला पाहिजे. कार्यक्रमास उद्घाटक म्हणून पर्यावरण तज्ञ पद्मश्री श्री चैत्रामजी पवार, साक्री तालुक्याच्या लोकप्रिय आमदार श्रीमती मंजुळाताई गावित उपस्थित होते. तसेच साई कृष्णा रिसॉर्टचे संचालक श्री आप्पासाहेब श्री गोविंदरावजी एखंडे, पिंपळनेर नगरपरिषदेचे शिवसेना पक्षाचे गटनेते नानासाहेब श्री.ज्ञानेश्वरजी एखंडे , हस्ती बँक चे उपाध्यक्ष डॉ. दिलीपजी चोरडिया, हस्ती बँक पिंपळनेर शाखा चेअरमन कुंदनमलजी गोगड यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष श्री वसंतरावजी खैरनार यांनी केले. पर्यावरणाचा समतोल राखून शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेती केली पाहिजे व गोधन वाढवले पाहिजे असे पर्यावरण तज्ञ पद्मश्री श्री. चैत्रामजी पवार यांनी नमूद केले. शेतकरी बांधवांनी शासनातर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांचा व उपक्रमांचा अधिकाधिक फायदा घेऊन शेती कशी फायदेशीर होईल याकडे लक्ष दिले पाहिजे असे तालुकाच्या आमदार श्रीमती मंजुळाताई गावित यांनी सांगितले. तालुका कृषी अधिकारी श्री. योगेश जी सोनवणे यांनी शासनाच्या विविध योजनांची तसेच उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे श्री मंगेश व्यवहारे यांनी नैसर्गिक शेती करताना जीवामृत व बिजामृत याबाबत आणि सेंद्रिय व जिवाणू खतांबाबत माहिती दिली. डॉ. साहेबराव क्षिरसागर यांनी आर्थिक पत पुरवठा व शेतीपूरक उद्योग याबाबत माहिती दिली. जैन इरिगेशनचे श्री. सोळंकी साहेब यांनी कांदा पिकाचे रोग नियंत्रण व उत्पादन वाढ कशी केली पाहिजे. तसेच जमिनीत व चाळीत कांदा सडण्याची कारणे व त्यावर उपाय याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे मुख्य फलित म्हणजे आधुनिक शेतीसाठी एआय तंत्रज्ञानाचा (कृत्रिम बुद्धिमत्ता) वापर कसा करायचा यावर अल्बेडो फाउंडेशनचे संस्थापक श्री विक्रांत निकम व फायलो कंपनीचे मार्केटिंग हेड श्री विशाल मिरजे यांनी अनुक्रमे तात्विक बाजू व प्रात्यक्षिका सह माहिती दिली. श्री. विशाल मिरजे यांनी फायलो कंपनीचे कायरो व निरो या यंत्राचा शेतीसाठी कसा उपयोग होतो याचे सहज सोप्या भाषेत माहिती दिली. कायरो या यंत्राचा पिकाचे रोग व कीड व्यवस्थापन, पाणी व खत व्यवस्थापन आणि वातावरणाचा अंदाज यासाठी उपयोग होतो. या यंत्राची रेंज साधारणता एक किलोमीटर असते. यंत्राची किंमत रू. पस्तीस हजार ते पंचेचाळीस हजार पर्यंत असते. तसेच निरो या यंत्राचा फक्त पाणी आणि खत व्यवस्थापनासाठी उपयोग होतो. या इतरांची रेंज दीड ते तीन एकर असते. या यंत्राची किंमत रु.सहा हजार ते नऊ हजार पर्यंत असते असे नमूद केले. ए. आय. तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकरी पाणी, खते, पिकांसाठी लागणारे कीटकनाशके व बुरशीनाशके यावर होणारया खर्चात बचत करून उत्पन्नात वाढ करू शकतो. मेळाव्यास नंदुरबार, धुळे व नाशिक जिल्ह्यातील सुमारे एक हजार शेतकरी बांधवांची उपस्थिती होती. कृषी मेळाव्यात मिळालेल्या आधुनिक शेती तंत्रज्ञान बद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. शेतकऱ्यांचे शंकांचे निरसन होऊन शेतकरी सभागृहाच्या बाहेर जाताना एक नवीन विश्वास घेऊन बाहेर पडत होते असे जाणवले. शेतकऱ्यांच्या मानसिकतेत बदल झाला पाहिजे अशी भावना मेळाव्यात मार्गदर्शन करणाऱ्या सर्वच तज्ञांकडून व्यक्त करण्यात आली. कृषी मेळाव्यात शेती विषयक साहित्याचे स्टॉल लावण्यात आले होते. त्यामध्ये जैन इरिगेशन, ॲग्री रिसर्च, गोदावरी पब्लिकेशनचे शेती विषयक पुस्तके, उसाच्या रसापासून बनवणारे विविध पदार्थ, फवारणी करिता ड्रोन, अशा प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते. जय गुरुदेव रसवंती स्वीट्स, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे यांचा स्टॉल सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. या स्टॉल मध्ये उसाच्या रसापासूनची कुल्फी, सेंद्रिय गुळ , खोबरा पाक , गुलाबजामून , काकवी , पाणीपुरी, व ताजा रस अशा प्रकारचे शंभर टक्के नैसर्गिक उत्पादने ठेवण्यात आली होती. कार्यक्रमासाठी नवनीत पब्लिकेशन मुंबई ,हस्ती बँक दोंडाईचा, भूषण महाजन नाशिक यांनी भरीव मदत केली. तसेच काही समाज बांधवांनी आपल्या परीने हातभार लावला. साई कृष्णा रिसॉर्टचे संचालक श्री ज्ञानेश्वर जी एखंडे यांनी मेळाव्यासाठी वातानुकूलित हॉल विनामूल्य उपलब्ध करून दिला. कार्यक्रम अतिशय नियोजनबद्ध व सुसूत्र बद्ध होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीस नोंदणी झाल्यानंतर प्रत्येकाला बॅच व कीट वाटप करण्यात आले. तसेच स्वादिष्ट नाश्ता, चहा बिस्किटे व भोजनाची अतिशय उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या प्रसंगी नवनिर्वाचित नगरसेवक, कृषी भूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी, सरपंच, उपसरपंच , इतर लोकप्रतिनिधी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महात्मा फुले विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंतराव खैरनार, उपाध्यक्ष श्री शामराव मानकर, सचिव श्री श्रीराम जाधव ,सहसचिव श्री प्रदीप वाघ, कोषाध्यक्ष श्री भरत साळवे ,प्रकल्प संयोजक श्री राजेंद्र शिरवाडकर ,सह प्रकल्प संयोजक श्री कैलास सोनवणे तसेच मंडळाचे सर्व संचालक , स्वीकृत संचालक, सल्लागार मंडळ यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सौ.अनिता घरटे यांनी केले. कृषी मेळाव्यासाठी विशेष परिश्रम घेणारे मंडळाचे स्थानिक संचालक व प्रकल्प संयोजक इजि.श्री. राजेंद्र शिरवाडकर यांनी मनोगत व्यक्त करताना हा मेळावा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकरी बांधवांचा जीवन स्तर उंचावण्यासाठी आयोजित केला होता असे नमूद केले व सर्वांचे आभार मानले. मंडळाने मेळावा आयोजित केल्याबद्दल सर्वत्र कौतुक आहे.